आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१४ मार्च २०२४ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- सी ए ए म्हणजे नागरीकत्व सुधारणा कायदा हा नागरिकत्वाचे अधिकार देणारा असून कोणाचेही अधिकार काढून घेण्यासाठी केलेला नाही, असं केंद्रीय गृहमंत्र्यांचं प्रतिपादन

- एक देश एक निवडणूक समितीचा अहवाल राष्ट्रपतींना सादर

- राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाने संस्थापक शरद पवार यांचं छायाचित्र वापरु नये असे सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश

**आणि**

- रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या विजेतेपदासाठी चुरस/ विदर्भाला हातात ३ गडी असताना १८३धावांची गरज

**<><><><><>**

सी ए ए म्हणजे नागरीकत्व सुधारणा कायदा हा नागरिकत्वाचे अधिकार देणारा असून कोणाचेही अधिकार काढून घेण्यासाठी केलेला नाही असं गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटलं आहे. एका वृत्त संस्थेला मुलाखत देताना त्यांनी सांगितलं की या कायद्यामुळे अफगाणिस्तान, बांगला देश आणि पाकिस्तानातून आलेल्या स्थलांतरित हिंदू, बौद्ध, जैन, शीख, ख्रिस्ती आणि पारसी शरणार्थींना भारताचं नागरिकत्व मिळेल. या स्थलांतरीत नागरिकांचा समावेश भारतीय नागरिकांमध्ये

करुन घेतला जाणार असून ते निवडणूक लढवून लोकप्रतिनिधीही होऊ शकतील. एनआरसी म्हणजे नागरिकांची राष्ट्रीय नोंदणी आणि सीएएचा काहीही संबंध नाही, असंही त्यांनी स्पष्ट केलं. अल्पसंख्याकांनी या कायद्यामुळे घाबरुन जाण्याचं काहीच कारण नसून या कायद्यात कोणाचंही नागरिकत्व काढून घेण्याची तरतूद नाही. भारतात १५ ऑगस्ट १९४७ ते ३१ डिसेंबर २०१४ या काळात आलेल्या कोणत्याही नागरिकांचे स्वागत असल्याचंही त्यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

एक राष्ट्र एक निवडणूक संदर्भात माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या उच्चस्तरीय समितीनं आज नवी दिल्लीत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना अहवाल सादर केला आहे.केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल आणि इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते. समितीनं सादर केलेला अहवाल १८ हजार ६२६ पानांचा आहे. या अहवालात सर्व संबंधित पक्ष आणि तज्ज्ञांशी झालेल्या विस्तृत चर्चा आणि १९१ दिवसांच्या संशोधनाच्या निष्कर्षांचा समावेश असल्याची माहिती कायदा आणि न्याय मंत्रालयानं दिली आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज दिल्लीतल्या जवाहरलाल नेहरू स्टेडियमवर आयोजित कार्यक्रमात ‘प्रधानमंत्री स्वनिधी’ योजनेच्या लाभार्थ्यांना संबोधित करणार आहेत. यावेळी ते दिल्ली मेट्रोच्या चौथ्या टप्प्यातल्या दोन अतिरिक्त कॉरिडॉरची पायाभरणीही करणार आहेत.

‘प्रधानमंत्री स्वनिधी योजना’ कोरोना काळात १ जून २०२० साली सुरू करण्यात आली होती. या योजनेअंतर्गत आज दिल्लीतल्या ५ हजार फेरीवाल्यांसह एक लाख

इतर फेरीवाल्यांनाही कर्ज वितरित केली जाणार आहेत. आतापर्यंत देशभरात ६२ लाखांहून अधिक फेरीवाल्यांना १० हजार ९७८ कोटी रूपयांहून अधिक जास्त रकमेची कर्ज वितरित करण्यात आली आहेत.

<><><><><>

संरक्षण मंत्रालयानं हलक्या वजनाच्या ३४ प्रगत हेलिकॉप्टरची खरेदी करण्यासाठी हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड बरोबर ८ हजार ७३ कोटी रुपयांचे दोन करार केले आहेत. यापैकी २५ हेलिकॉप्टर्स भारतीय लष्करासाठी, तर ९ हेलिकॉप्टर्स भारतीय तटरक्षक दलासाठी असल्याचं संरक्षण मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. भारतीय बनावटीच्या, म्हणजेच देशांतर्गत डिझाईन, विकास आणि उत्पादनाची खरेदी या धोरणा अंतर्गत हा करार झाल्याचं यात म्हटलं आहे.

भारतीय लष्करासाठी खरेदी केलेली हेलिकॉप्टर्स शोध, बचाव कार्य, सैन्याची वाहतूक, लष्करी साहित्याची वाहतूक आणि अपघातग्रस्तांना मदत करण्याच्या दृष्टीने बनवण्यात आली आहेत. तर, तटरक्षक दलासाठी खरेदी केलेली हेलिकॉप्टर्स सागरी देखरेख, शोध, बचाव कार्य, मालवाहतूक आणि कर्मचाऱ्यांची वाहतूक करण्याच्या दृष्टीने बनवण्यात आल्याचं यात म्हटलं आहे. या प्रकल्पामुळे संरक्षण क्षेत्रातल्या रोजगार निर्मितीला चालना मिळेल असं या निवेदनात म्हटलं आहे.

<><><><><>

महामार्गांवर टोल भरण्याकरता पेटीएम फास्टटॅग वापरणाऱ्यांनी दुसऱ्या बँकेचा फास्टटॅग वापरावा, अशी सूचना भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणानं दिली आहे. भारतीय रिझर्व बँकेनं पेटीएमवर निर्बंध घातले असल्याने पेटीएमच्या फास्टॅगमधे उद्यापासून रक्कम भरता येणार नाही. त्यामुळे इतर फास्टॅगची

व्यवस्था न केल्यास टोलची दुप्पट रक्कम भरावी लागेल किंवा दंड भरावा लागेल. मात्र पेटीएमच्या फास्टॅगमधे शिल्लक रक्कम संपेपर्यंत तो वापरता येईल असं प्राधिकरणाने स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

मूत्रपिंडाचं आरोग्य आणि आजारांविषयी जनजागृतीसाठी आज वर्ल्ड किडनी डे पाळला जात आहे. किडनी, म्हणजेच मूत्रपिंडाचं आरोग्य आणि त्याच्या सर्वसामान्य कार्यावर विपरीत परिणाम करणाऱ्या रोगांविषयी जागृती निर्माण करण्यासाठी दर वर्षी मार्च महिन्याचा दुसरा गुरुवार वर्ल्ड किडनी डे म्हणून पाळला जातो. ‘सर्वांसाठी मूत्रपिंडाचं आरोग्य’, ही यंदाची संकल्पना आहे.

**<><><><><>**

नवमतदारांसाठी मेरा पहला वोट देश के लिए हे मतदार जागरूकता अभियान सुरू आहे. निवडणूक हा लोकशाहीचा उत्सव असतो. यावेळी पहिल्यांदा मतदान करणार असलेल्या नवमतदारांनी या लोकशाहीच्या उत्सवामध्ये सहभागी होऊन आपला मतदानाचा हक्क बजावावा, असं आवाहन अभिनेता सुबोध भावे यांनी केलं आहे.

**होल्ड बाईट...सुबोध भावे**

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटानं संस्थापक शरद पवार यांचं नाव आणि छायाचित्र वापरु नये असे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं दिले आहेत.

अजित पवार गट हा प्रचारासाठी शरद पवार यांचं छायाचित्र आणि नाव वापरत असल्याच्या विरोधात राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षानं दाखल केलेल्या याचिकेच्या सुनावणी दरम्यान सर्वोच्च न्यायालयानं हे आदेश दिले. अजित पवार गट हा निवडणूक आल्यावर शरद पवार यांचं नाव वापरतो मात्र निवडणूक नसतांना त्यांना त्यांची गरज वाटत नाही. आता जर तूम्ही स्वतःचं स्वतंत्र अस्तित्व निर्माण केलं आहे तेच पुढे सुरु ठेवावं अशी टिप्पणीही न्यायालयानं केली. या संदर्भात अजित पवार गटाला दोन दिवसांत प्रतिज्ञापत्र सादर करायला सांगितलं असून या संदर्भातील पुढची सुनावणी १९ मार्चला होणार आहे.

**<><><><><>**

शेतकरी आणि सर्वसामान्यांसाठी काँग्रेस सरकारचे दरवाजे सदैव खुले असतील असं काँग्रेस नेते आणि खासदार राहुल गांधी यांनी म्हटलं आहे. भारत जोडो न्याय यात्रेदरम्यान ते आज नाशिक जिल्ह्यात चांदवड इथं एका जाहीर सभेत बोलत होते. इंडिया आघाडीचं सरकारआल्यावर शेतकऱ्यांना जीएसटीमधून वगळणार असल्याचं , तसंच पीक वीमा योजनेची पुनर्रचना करणार असल्याचं आश्वासन त्यांनी दिलं. हमी भावाचा कायदा करावा या मागणीसाठी शेतकरी दिल्लीच्या सीमेवर आणि रामलीला मैदानावर आंदोलन करत आहेत. मात्र मोदी सरकार त्यांची दखल घेत नाही. अशी टीका त्यांनी केली.

यावेळी व्यासपिठावर शरद पवार आणि संजय राऊत यांच्या सह काँग्रेसचे अनेक नेते उपस्थित होते.

**<><><><><>**

अश्लील आणि असभ्य आशय प्रसारित केल्याबद्दल १८ ओटीटी मंचांवर माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं बंदी घातली आहे. तसंच या मंचांशी संबंधित

१९ वेबसाईट्स, १० ॲप्स आणि ५७ सोशल मीडिया खाती भारतात सार्वजनिक वापरासाठी बंद केली आहेत. माहिती आणि तंत्रज्ञान कायदा २००० च्या तरतुदींनुसार, इतर मंत्रालयं, माध्यम आणि मनोरंजन क्षेत्र तसंच महिला आणि बाल हक्कांशी संबंधित तज्ज्ञांशी सल्लामसलत करून मंत्रालयानं हा निर्णय घेतला. बंदी घालण्यात आलेल्या ओटीटी मंचांवर अश्लील, असभ्य आणि महिलांसाठी अपमानकारक ठरेल, असा आशय मोठ्या प्रमाणात प्रसारित झाल्याचं माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

<><><><><>

मंबई संघानं आज पुन्हा एकदा रणजी करंडक जिंकला असून विदर्भ संघाचा १६९ धावांनी पराभव केला. मुबईने विदर्भाला विजयासाठी ५३८ धावांच आव्हान दिलं होतं पण विद्रभाचा डाव ३६८ धावांवर आटोपला.

<><><><><>

अमेरिकेच्या संसदेनं टिकटॉक ॲप वर बंदी घालण्याशी संबंधित ऐतिहासिक विधेयक पारित केलं आहे. या विधेयकानुसार टिकटॉक ॲप जर आपल्या ‘बाईट डान्स’ या मूळच्या चिनी कंपनीपासून वेगळं झालं नाही, तर त्यावर अमेरिकेत बंदी घातली जाऊ शकेल. १७० दशलक्ष अमेरिकी नागरिक टिकटॉक चा वापर करतात. जगातल्या सर्वात लोकप्रिय टिकटॉक या सोशल मीडिया व्यासपीठासाठी हा मोठा धक्का समजला जात आहे.

//<><><><><> //